## इयत्ता–पाचवी– पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. शाळेतले अनुभव घरातील आणि परिसरातील व्यक्तींपुढे प्रात्यक्षिकांसह सादर करणे.

२. वर्गमित्रांचे रीतीरिवाज, अनुभव, भावभावना समजून घेणे.

३. स्पष्ट शब्दोच्चारांसह समजून प्रकट वाचन करणे.

४. एका मिनिटाला सुमारे ३० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे.

५. रेषेची लांबी, दिशा आणि वळणे लक्षात घेऊन शब्दलेखन करण्याचा सराव करणे.

६. श्रवण, भाषण तसेच वाचन–शब्दसंपत्तीचा संग्रह करणे.

७. पाठ्यपुस्तकाच्या आणि अपरिचित वाचनसाहित्याच्या वाचनाचा आनंद घेणे. कथा, कवितांमधील व्यक्तिरेखांच्या भावभावना समजणे.

८. सुमारे ९०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ३५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि ९० दृक्–शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

# इयत्ता ५ वी – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सूचना | शारीरिक शिक्षण, कार्यानुभव या विषयांच्या मराठी सूचना तयार करणे. त्यांच्या मदतीने प्रात्यक्षिक दाखवून संबंधित कृती करवून घेणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे, सूचना ऐकणे आणि गटांत त्या कृती करणे. | सलग सूचनांमुळे उपकृतींचा क्रम लक्षात येतो. | सूचनांप्रमाणे कृती केल्याचे समाधान मिळते. | परिसरातील मित्रांना वर्गातील कृतींचे वर्णन करून सांगतात. | निरीक्षण व नोंद |
| समूहगीते | राष्ट्रीय सण, विशेष अथवा वार्षिक समारंभप्रसंगी गावयाच्या समूहगीतांचा सराव करून घेणे. | समूहगीतांचा अर्थ, चाल, लय समजून घेणे आणि एकसुरात गीत गाणे. | एकसुरात गाण्याचे महत्त्व पटते. | आनंदाने गातात. | समूहात एकसुरात गातात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| भाषण | विद्यार्थ्यांच्या घरी साजऱ्या होणाऱ्या सण समारंभांबद्दल प्रश्न विचारून माहिती घेणे. | विचारलेल्या प्रश्नांची पूर्वानुभवांवरून आणि कुटुंबात झालेल्या चर्चांच्या आधारे उत्तरे देणे. अनुभवाधारित भाषण करणे. | आपल्या समाजात होणाऱ्या समारंभात मिळालेली माहिती आणि इतर विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती यातील साम्यभेद लक्षात येतात. | नव्या माहितीचा आनंद होतो. | मित्रांच्या घरी साजऱ्या होणाऱ्या सणांचे ऐकलेले वर्णन घरी पालकांना ऐकविणे. | तोंडी चाचणी (माहिती देणे) |
| अक्षरांचे खेळ | एका शब्दातील अक्षरांपासून अनेक शब्द बनविणे. उदा. अहमदनगर, अहमद, नगर, मदन, मगर इ. | दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून वेगवेगळ्या जुळण्या करून पाहून अनेक शब्द बनविणे. | विचार करून अक्षरांपासून वेगवेगळे शब्द कसे बनतात ते कळते. | नव्या खेळात मिळालेल्या यशामुळे अक्षरांचे आणखी खेळ खेळावेसे वाटतात. | अक्षरांच्या खेळात भाग घेतात. दिलेल्या अक्षरापासून शब्द बनवून लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |
| शब्दलेखन | दिलेल्या अक्षरांपासून शब्द बनविणे. जसे– श, स, ळ, द, र, क, न, म, घ, ह – शरद, हसन, घर, कमळ इ. | दिलेल्या अक्षरांपासून शब्द बनविणे, लिहिणे. | – | भाषिक खेळाचा आनंद घेतात. | मित्रांना कोडी घालतात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाक्यलेखन | विद्यार्थ्यांनी बनविलेल्या शब्दांना योग्य क्रियापदांची जोड देऊन वाक्ये बनविण्यास व ती लिहून काढण्यास सांगणे. | स्वतः बनविलेल्या शब्दांना योग्य क्रियापदे जोडून वाक्ये तयार करणे व लिहून काढणे. | शब्दांना क्रियापदांची जोड दिल्यावर वाक्याला अर्थ येतो हे पुसटसे जाणवते. | वाक्ये बनविण्यात यश मिळाल्याचा आनंद होतो. | दिलेल्या शब्दांना क्रियापदांची जोड देऊन वाक्ये तयार करतात व लिहितात. | स्वाध्याय |
| सुलेखन | अक्षरांचा योग्य आकार व अक्षरात योग्य अंतर ठेवून लेखन कसे करतात याचे प्रात्यक्षिक दाखविणे आणि विद्यार्थ्यांना सुलेखन करण्यास सांगणे. | प्रात्यक्षिकात दाखविल्याप्रमाणे चौरेघीत अक्षरांचा योग्य आकार काढून आणि त्यांत योग्य अंतर ठेवून लेखन करणे. | काळजीपूर्वक केलेले लेखन छान दिसते याची जाणीव होते. | सुलेखनाचा आनंद होतो. | काळजीपूर्वक लेखन करतात. | निरीक्षण व नोंद |
| अनुलेखन, श्रुतलेखन | शब्द व वाक्ये यांचे अनुलेखन व श्रुतलेखन करविणे. | गटात परस्परांना अनुलेखन करण्यास मदत करतात. | शब्दोच्चार व लेखन यातील संबंध लक्षात येतात. | अचूक लेखन झाल्याचे समाधान वाटते. | चुका न करता श्रुतलेखन करतात. | लेखी चाचणी (अनुलेखन व श्रुतलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाचन | मर्यादित आणि सोपा मजकूर असलेली वाचनकार्डे वाचन कोपऱ्यात उपलब्ध करून देणे. | आपापल्या आवडीनुसार कथा, कविता, विनोद, कोडी असलेली वाचनकार्डे घेऊन वाचणे. | वाचनसाहित्याचे वेगवेगळे प्रकार असल्याची जाणीव होते. | आवडीचे वाचनसाहित्य वाचायला मिळाल्याचा आनंद होतो. | विविध प्रकारचे साहित्य वाचतात. | निरीक्षण व नोंद |
| प्रकटवाचन | विशिष्ट उताऱ्यांचे प्रकटवाचन करताना कोणत्या गोष्टींमुळे मजा येते ते शोधावयास सांगणे. | लक्षपूर्वक ऐकणे. गटातील मित्रांसमोर प्रकटवाचन करणे. | समान अक्षरे व शब्द यांच्या पुनरावृत्तीमुळे प्रकट वाचन ऐकताना मजा येते हे जाणवते. | प्रकटवाचन ऐकण्याची मजा अनुभवतात. | वर्गात अर्थपूर्ण प्रकटवाचन करतात. | तोंडी चाचणी (प्रकटवाचन) |
| कविता | कवितेची पार्श्वभूमी स्पष्ट करणे. कविता वाचनानंतर महत्त्वाच्या तपशिलांवर प्रश्न विचारणे. | पार्श्वभूमी लक्षपूर्वक समजून घेणे. प्रश्नांची उत्तरे शोधताना कवितेतील वस्तुस्थिती आणि तिच्यावर कवीने केलेल्या कल्पना शोधणे. | कवितेतील आवडलेल्या गोष्टींची नोंद घेतात. | कवितेचा आनंद घेतात. | कवितेतील महत्त्वाच्या तपशिलांवरील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहितात. | लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| कथा | कथेतील घटना, त्यांचा क्रम, पात्रे, त्यांचे वागणे, बोलणे इ. तपशील समजावून घेण्यास मदत करणे. | कथा वाचणे, त्यात आलेल्या शंका विचारणे. | कथेतील महत्त्वाचे तपशील समजतात. | कथा वाचनाचा आनंद घेतात. | कथेतील तपशिलांवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहितात. | लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

## अध्ययन क्षेत्र – भाषेच्या नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| शब्दांची नादमयता | ढगांचा गडगडाट, झऱ्यांचा खळखळाट इ. शब्दांचे निरीक्षण करावयास देणे. असेच आणखी शब्द सांगण्याचे आवाहन करणे. | सूचनेनुसार नवे शब्द सुचविणे. या शब्दांचे वैशिष्ट्य शोधणे. | प्रत्येक वस्तू आणि संबंधित आवाज यांच्यातील साहचर्य लक्षात राहते. | नादमय शब्दांची पुनरावृत्ती आनंद देते. | या शब्दांना नाव सुचवितात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| विरुद्धार्थी शब्द | वाचन साहित्यात आलेल्या शब्दांच्या याद्या पुरविणे. सूचना देणे. विद्यार्थ्यांनी विरुद्धार्थी शब्दांचे वाक्यात केलेले उपयोग तपासणे आणि आवश्यक ती दुरुस्ती सुचविणे. | सूचनांनुसार याद्यांचे निरीक्षण करून त्यातील विरुद्धार्थी शब्द एकमेकांसमोर लिहिणे. विरुद्धार्थी शब्दांचे वाक्यात उपयोग करणे. | शब्दांचे वाचनातील संदर्भ आठवतात. | वर्गाच्या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद होतो. | विरुद्धार्थी शब्दांचा वाक्यांत उपयोग करतात. | तोंडी चाचणी (विरुद्धार्थी शब्द) |
| शब्दसंग्रह | वाचनात ज्यांचा नव्याने परिचय झाला आहे, अशा शब्दांची अर्थासह यादी तयार करून 'आमचा शब्दसंग्रह' यासाठी संबंधित वर्गमित्राकडे देण्याच्या सूचना देणे. | नव्याने परिचित झालेल्या शब्दांचे संदर्भाने कळलेले अर्थ लिहून काढणे. | शब्दांचे अर्थ संदर्भामुळे निश्चित होतात हे लक्षात येते. | नवीन माहिती मिळाल्याचा आनंद होतो. | अर्थासह लिहिलेले नवे शब्द शिक्षिकांच्या संमतीने 'आमचा शब्दसंग्रह' साठी विशिष्ट वर्गमित्राकडे सुपूर्त करणे. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| शब्दांचे लिंग | लिंगभेद दर्शविणारी वाक्ये असलेला तक्ता लावून सूचना देणे. | वाक्ये वाचणे. क्रियापदांचे निरीक्षण करून त्यांच्यातील फरकांच्या कारणांची चर्चा करणे. | परस्परांच्या म्हणण्यातील तर्कसंगती तपासतात. निरीक्षण करून कर्ता शोधतात. | नवीन माहिती मिळाल्याचा आनंद होतो. | दिलेल्या वाक्यांतील प्राणी आणि वस्तू यांची लिंगे ओळखतात. | – |
| | विद्यार्थ्यांना कारण सांगता आले नाही तर क्रिया कोणती, ती करणारे कोण, असा प्रश्न उपस्थित करणे. कर्ता पुरुष, स्त्री अथवा अन्य कोणी हे काढून घेऊन स्पष्टीकरण देणे. | संबंधित नामे सांगणे. स्पष्टीकरण समजावून घेणे. | | | | |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| विरामचिन्हे– पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह | पाठ्यपुस्तकातील पाठाचे विरामचिन्हे लक्षात घेऊन प्रकट वाचन करणे. अन्य पाठातील संबंधित चिन्हांचा उपयोग केलेली वाक्ये निवडून वाचण्यास सांगणे. | लक्षपूर्वक ऐकणे. संबंधित चिन्हे असलेली वाक्ये शोधणे. | वाचनातील विरामचिन्हांचे उपयोग लक्षात येतात. | – | दिलेल्या उताऱ्यातील विरामचिन्हे लक्षात ठेवून वाचन करतात. | तोंडी चाचणी |
| नाम | फलकावर वस्तू, प्राणी, व्यक्ती, ठिकाणे, गुण असे रकाने पाडून पुढे खेळाच्या सूचना देणे. | गटांमधील स्पर्धेत सहभागी होणे. शिक्षिकेने खूण करताच आपल्या वाट्याला आलेल्या रकान्यात लिहिण्यासाठी नावे सांगणे. वेळ संपण्याची खूण होताच थांबणे. | संबंधित रकान्यातील जास्तीत जास्त नावे आठवतात. | खेळाची गंमत घेतात. | दिलेल्या उताऱ्यातील नामे शोधून त्यांचे वर्गीकरण लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | रकान्यांतील नावांना 'नामे' म्हणतात असे सांगून रकान्यांच्या शीर्षकांच्या मदतीने नामाची व्याख्या तयार करण्यास सांगणे. आवश्यक तेथे मदत करणे. | गटात चर्चा करून आपल्या गटाने तयार केलेली व्याख्या सांगणे. व्याख्यांची तुलना करून योग्य व्याख्या बनविणे. | कारणांची तुलना करून योग्य पर्यायांची निवड करतात. शोधून काढलेले कारण कसे योग्य आहे ते पटवून देतात. | नवीन ज्ञानाचा आनंद होतो. व्याख्या तयार करण्यातल्या यशाचा अभिमान वाटतो. | दिलेल्या उताऱ्यातील नामे शोधून लिहितात. रिकाम्या जागी योग्य नामांची निवड करून वाक्ये लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |
| क्रियापद | क्रियापदे असलेले शब्दसमूह (वाक्ये) आणि क्रियापदे नसलेले शब्दसमूह वाचून घेणे. कोणत्या शब्दसमूहांचा अर्थ कळतो आणि कोणत्या शब्दसमूहांचा अर्थ कळत नाही ते ओळखून घेणे. हा फरक कशामुळे पडला ते विचारणे. | दोन्ही गटातील शब्दसमूहांचे निरीक्षण करणे. फरक पडण्याची कारणे शोधणे. | तर्कांच्या साहाय्याने कारणे शोधतात. | व्याख्येसंबंधी झालेल्या ज्ञानाचा आनंद होतो. खेळात रस घेतात. | उताऱ्याचे श्रुतलेखन करून त्यातील सर्वनामे अधोरेखित करतात. | लेखी चाचणी (श्रुतलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | योग्य निवडीबद्दल शाबासकी देणे. निवड केलेल्या शब्दांना 'क्रियापदे' म्हणतात हे सांगणे. | | | | | |
| | क्रियापदांमध्ये कोणते साम्य आहे अथवा त्या शब्दांमुळे कशाचा बोध होतो ते शोधण्यास सांगणे. | चर्चा करणे. | क्रियापदांमधील साम्य शोधताना ते कृतीचा, अथवा क्रियेचा बोध करतात हे लक्षात येते. | साम्य आणि बोध यांचा शोध घेतल्याचा आनंद होतो. | आपले म्हणणे योग्य शब्दांत पटवून घेतात. | |
| | विद्यार्थ्यांनी क्रियापदांची सांगितलेली कार्ये फलकावर लिहिणे. त्या कार्यांच्या मदतीने क्रियापदाची व्याख्या बनविण्यास सांगणे. आवश्यक तेथे मदत करणे. | चर्चेतून व्याख्या तयार करणे. | व्याख्येत त्या त्या शब्दाच्या वैशिष्ट्यांचा समावेश करावयाचा असतो हे लक्षात येते. | | आपले म्हणणे योग्य शब्दांत पटवून घेतात. | |

## इयत्ता – सहावी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. सलग सूचना ऐकून त्यानुसार कृती करणे.

२. गाणी, कविता एकट्याने आणि समूहात तालासुरात म्हणणे.

३. ऐकून आवडलेल्या गोष्टी सांगणे.

४. विरामचिन्हांसह अचूक अनुलेखन आणि श्रुतलेखन करणे.

५. स्वतःचे अनुभव, कल्पना दोन–चार वाक्यांत लिहिणे.

६. कथा, कवितांचे आनंद घेत वाचन करणे.

७. एका मिनिटाला सुमारे ३५ शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे.

८. प्रकट वाचनातील समान अक्षरांच्या अथवा शब्दांच्या पुनरावृत्तीमुळे येणारी मजा अनुभवणे.

९. वाक्यांतील नामांचे लिंग व वचन ओळखणे तसेच दिलेल्या शब्दांच्या विरूद्धार्थांचे शब्द सांगणे.

१०. सुमारे १००० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ४०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि १०० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

११. साहित्यातील वर्णन केलेल्या समस्या समजणे.

१२. सामाजिक समस्यांबद्दल अन्य व्यक्तींशी चर्चा करणे.

# इयत्ता ६ वी –पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र १ – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| शब्दसंपत्ती | बोलताना जाणीवपूर्वक विविध शब्दांचा वापर करणे.<br><br>मुलांच्या शब्दसंपत्तीत वाढ होण्यासाठी शब्दकोडी सोडवून घेणे.<br>शब्दभेंड्या यांसारखे खेळ घेणे.<br><br>प्रत्येक विद्यार्थ्याला अक्षरे वाटून देणे. | नव्याने माहिती झालेले, ऐकलेले शब्द 'आमचा शब्दसंग्रह'मध्ये नोंदविणे.<br>बोलताना व्यवहारामध्ये या शब्दांचा योग्य तेथे वापर करणे.<br><br>आपल्या वाट्याला आलेल्या अक्षरांचे शब्द वर्गातील मुलांकडून गोळा करणे व 'आमचा शब्दसंग्रह' यात नोंद करणे. | वर्गमित्रांशी होणाऱ्या संभाषणातून स्वतःच्या शब्दसंपत्तीत वाढ होते, हे लक्षात येते. | शाब्दिक खेळ खेळण्याचा आनंद घेतात. | दैनंदिन व्यवहारात बोलताना, लिहिताना योग्य शब्दांचा वापर करतात. | प्रकल्प |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाचनसाहित्य | पाठ्यपुस्तकातील पाठ वाचायला देऊन कोणते पाठ आवडले, ते का आवडले, याविषयी विचारणा करणे.<br><br>पाठ्येतर साहित्य मुलांना वाचनासाठी उपलब्ध करून देणे.<br><br>त्यासाठी वर्गातील वाचनकोपऱ्यामध्ये मुलांना आवडतील अशी व सहज घेता व हाताळता येतील अशी पाठ्येतर साहित्याची मांडणी करणे. | पाठांमधील कोणत्या कल्पना, कोणते विचार आवडले व ते का आवडले, हे सांगणे.<br><br>उपलब्ध झालेले वाचनसाहित्य आवडीने वाचणे. | वाचनसाहित्याचे वेगवगळे प्रकार असल्याची जाणीव होते. | अवांतर वाचनातून, गोष्टी वाचनातून आनंद मिळतो. | अवांतर वाचनाची सवय लागते. | निरीक्षण, उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| प्रकटवाचन | पाठांचे व अपरिचित साहित्याचे स्पष्ट शब्दोच्चारांसह, योग्य आरोह–अवरोहासह व योग्य गतीने वाचन करण्यास सांगणे. त्यासाठी अनुवाचनाचा सराव घेणे. टेपरेकॉर्डर, मोबाईल यांच्याद्वारे रेकॉर्डिंग करून/ऐकवून प्रत्येकाच्या प्रकट वाचनात होणाऱ्या गंमती दाखवून त्यातून सुधारणा करणे. व (काही विशिष्ट नमुने) | स्पष्ट शब्दोच्चारासह योग्य प्रकारे प्रकट वाचनाचा प्रयत्न करणे. | प्रकट वाचन उत्तम प्रकारे कसे करावे हे समजते. | प्रत्येकाच्या प्रकट वाचनात होणारी गंमत अनुभवतात.<br><br>वाचताना आत्मविश्वास वाढतो. | परिचित व अपरिचित मजकुरांचे प्रकटवाचन योग्य प्रकारे करतात. | तोंडी काम (प्रकटवाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| लेखन | पाठ्यपुस्तकातील व इतर साहित्यातील वाक्यांचे अनुलेखन करून घेणे. | अनुलेखन करताना अक्षरांचा योग्य आकार, अक्षरे-शब्दांतील योग्य अंतर लक्षात घेऊन अचूक लेखन करणे. | विरामचिन्हांचा वापर करून लेखन करतात. | अचूक लेखन करता आल्यामुळे आत्मविश्वास वाढतो. | अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात. | निरीक्षण उपक्रम (अनुलेखन व श्रुतलेखन) |
| | सोप्या, छोट्या वाक्यांचे श्रुतलेखन करण्याचा सराव घेणे. | श्रुतलेखन करताना शिक्षकांचे उच्चारण लक्षपूर्वक ऐकणे व बिनचूक वाक्ये लिहिण्याचा प्रयत्न करणे. | | | | |
| | लेखनासाठी विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्वाशी निगडित विषय देणे. | स्वतःच्या भावना, कल्पना, विचार चार ते पाच वाक्यांत लिहिण्याचा प्रयत्न करणे. | | आपले विचार व्यक्त केल्याचा आनंद होतो. | स्वतःचे विचार लेखी व्यक्त करतात. | लेखी चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| नादमयता (शब्दांमुळे) | प्राणी, वाहने, वाद्ये, कृती यांची नावे असलेली कार्डे व विविध नादमय शब्द लिहिलेली कार्डे गटांमध्ये वाटणे व जोड्या जुळविण्याच्या खेळासंबंधी सूचना देणे.<br>उदा. बेडूक – डराँव डराँव<br>ढोल – ढम्ढम्<br>पिणे – घटाघटा इ. | गटामध्ये आपल्या वाट्याला आलेल्या कार्डाशी जोडी जुळणारे कार्ड शोधणे.<br>शोधलेल्या जोड्यांचे वाचन करणे.<br>सर्व जोड्यांचे पुन्हा एकत्र वाचन करणे. | प्रत्येक वस्तू, प्राणी, वाहने, वाद्ये व कृती आणि संबंधित आवाज यांच्यातील साहचर्य लक्षात राहते. | खेळाचा आनंद लुटतात. | परिसरातील विविध ध्वनी लक्षपूर्वक ऐकून प्राणी, वाहने, वाद्ये, कृती यांच्याशी संबंधित नव्या नादमय शब्दांची लेखी यादी तयार करतात. | स्वाध्याय<br>लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| कथाकथन | ऐकलेल्या, वाचलेल्या कथा सांगण्यासाठी प्रवृत्त करणे. कथा सांगितल्याबद्दल सांगणाऱ्यांचे कौतुक करणे. | वेगवेगळ्या विषयांवर कथा सांगणे. इतरांच्या कथा लक्षपूर्वक ऐकणे. | विविध विषयांवरील कथा माहिती होतात. | कथा सांगण्याचा आत्मविश्वास वाढतो व इतरांच्या कथा ऐकण्याचा आनंद होतो. | कथाकथन आत्मविश्वासपूर्वक करतात. | तोंडी काम (कथाकथन) |
| वचन | वर्गातील, शाळेतील अथवा दप्तरातील वस्तूंची नावे विचारून फलकावर लिहिणे. लिहिताना फलकाचे दोन भाग करून शब्द लिहिणे. उदा. वही – वह्या भिंत – भिंती शब्दांच्या रूपांमधील फरक मुलांना शोधायला लावणे. गटात काम करण्याविषयी सूचना देणे. | विविध नावांच्या एकवचनी आणि अनेकवचनी रूपांचे निरीक्षण करणे. त्यातील वेगळ्या रूपांसंबंधी चर्चा करणे. माहिती असलेल्या नावांचे वचन बदलणे. | एका गटातील शब्दांची त्याच प्रकारच्या दुसऱ्या गटातील शब्दांशी तुलना करतात. | नवीन माहिती मिळाल्याचा आनंद होतो. | दिलेल्या शब्दांचे वचन बदलून ते शब्द लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| समान अर्थाचे शब्द | कार्डांवर एकाच प्रकारची चित्रे व त्याखाली समान अर्थांचे शब्द असलेली नावे लिहून ती कार्डे वर्गात वाटणे. सारखी चित्रे असणाऱ्या मुलांना गट करायला लावणे.<br><br>परिचित समानार्थी शब्दांचा जाणीवपूर्वक वापर केलेल्या उताऱ्यांचे कार्ड गटात देणे. त्यातील समान अर्थाच्या शब्दांच्या याद्या करायला सांगणे. | सूचनेप्रमाणे गट तयार करून आपापल्या कार्डावरील चित्राखालील नाव वाचणे. उदा. सूर्याची चित्रे व त्याखाली रवी, भास्कर, सविता इ.<br><br>उतारा वाचून समानार्थी शब्दांच्या याद्या गटात तयार करणे. गटांमधून तयार झालेल्या शब्दांची नोंद 'आमचा शब्दसंग्रह' मध्ये करणे. | एकच वस्तू, व्यक्ती, प्राणी इ.साठी अनेक शब्द असतात हे समजते.<br><br>शब्दांचे वाचनातील संदर्भ आठवतात. | वर्गात खेळ खेळल्याचा आनंद होतो. | समानार्थी शब्दांचा बोलताना व लिहिताना योग्य संदर्भात वापर करतात. | तोंडी काम<br>स्वाध्याय<br>(शब्दलेखन) |

## इयत्ता – सातवी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नांतून पुढील **उद्दिष्टे** साध्य करावीत यासाठी चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. सार्वजनिक ठिकाणी दिलेल्या श्राव्य व लिखित सूचना आणि संदेश समजणे.

२. गाणी व कवितांमधील आशय आणि कवीने केलेल्या कल्पना सांगणे.

३. एका मिनिटाला सुमारे ४० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे.

४. पाठ्य व पुरवणी वाचनसाहित्यांतील कथांमधील आणि नाटकांतील घटनांचा क्रम व त्यामागील कारणे सांगणे.

५. अन्य व्यक्तींच्या जीवनातील अनुभव समजून घेणे.

६. अचूक, स्पष्ट शब्दोच्चार, तसेच विरामचिन्हे लक्षात घेऊन प्रकट वाचन करणे.

७. परिचित मजकुराचे अनुलेखन आणि श्रुतलेखन करणे.

८. स्वतःचे अनुभव, कल्पना किंवा विचार चार ते सहा वाक्यांत लिहिणे.

९. नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या शब्दांच्या जातींची वैशिष्ट्ये ओळखून त्यांचा उपयोग करणे.

१०. आवडलेली कथा, कविता, विनोद साभिनय सादर करणे.

११. सुमारे ११०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती व सुमारे ४५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती व १२० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

१२. सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि त्यांची अर्थासह 'आमचा शब्दसंग्रह' विकसित करण्यासाठी नोंद करणे.

१३. अन्य भाषांबद्दल आदर बाळगणे.

# इयत्ता ७ वी – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सूचना (श्राव्य व लिखित) | शाळेत, क्षेत्रभेटीच्या वेळी आवश्यक असणाऱ्या सूचना वेळोवेळी देणे. त्यांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे. सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या लिखित सूचनांकडे लक्ष वेधणे. त्या वाचायला सांगणे. अर्थबोध होण्यास मदत करणे. परिसरात वाचलेल्या नवीन सूचना विचारणे. | सूचना लक्षपूर्वक ऐकणे. अर्थ समजून कृती करणे. सूचनांचा अर्थ न समजल्यास मित्रांना/शिक्षकांना मराठीतून अर्थ विचारणे. लिखित सूचना वाचून त्यानुसार स्वतः कृती करणे व इतरांना प्रवृत्त करणे. | श्राव्य व लिखित सूचना समजते. | जबाबदारी समजते. | सूचना पाळतात. प्रसंगानुरूप सूचना तयार करतात. | निरीक्षण |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गप्पा, संभाषण | क्षेत्रभेटीच्या वेळी शाळेत व घरी आलेल्या अनुभवांवर आधारित गप्पा मारण्यास सांगणे. | मित्र व अन्य व्यक्तींबरोबर व्यवहार करताना आलेल्या अनुभवांची देवाणघेवाण करणे. प्रश्न विचारणे, उत्तरे देणे. नवनवीन शब्द आत्मसात करणे. | योग्य शब्दांची, वाक्यांची रचना करतात. नवीन शब्दांचा अर्थ समजतात. | इतरांचे अनुभव समजून घेण्याने जवळीक वाढते, याची अनुभूती घेतात. | नवीन परिचय झालेल्या शब्दांचा वापर आवर्जून करतात. | तोंडी काम (संभाषण) |
| भाषण | विद्यार्थ्यांना आवडता विषय विचारणे. त्यावर काय बोलायला आवडेल ते विचारणे. त्यासाठी आवश्यक ती मदत करणे. गटात व वर्गासमोर भाषण करण्यास सांगणे. | स्वतःचा आवडता विषय सांगणे. आशयाची निश्चिती करणे. शब्द, वाक्य व उच्चारण या बाबतीत आलेल्या अडचणी शिक्षकांना विचारणे. सलग परिच्छेद तयार करणे. गटात व वर्गासमोर भाषण देणे. | विषय सलग व मुद्देसूद मांडता येतो. | आत्मविश्वास वाढतो. | विशेष दिन, राष्ट्रीय दिन यांसारख्या प्रसंगी भाषणांच्या उपक्रमात भाग घेतात. | तोंडी काम (भाषण) उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| घटनाक्रम | पाठ्य व पुरवणी वाचन,साहित्यातील कथा, नाटक यांचे सादरीकरण झाल्यावर त्यातील घटनाक्रम दर्शविणारी वाक्यांची कार्डे तयार करून ती गटात वाटणे. त्यांचा क्रम लावण्यास सांगणे. कथा, नाटक यात 'असेच का घडले' यामागील कारणे विचारणे. आणखी काय घडू शकेल ते विचारणे. | कथा, नाटक यांचे सादरीकरण लक्षपूर्वक ऐकणे. गटातील वाक्यकार्डांचे वाचन करणे, क्रम लावणे, सलग वाचन करणे. कारणे शोधण्यासाठी अंदाज करणे. | कथानक समजतात. | क्रम लावण्यात आनंद घेतात. | घटनाक्रम लक्षात घेऊन वाचन करतात. | वर्गकार्य, स्वाध्याय |
| आशय व कल्पना | गाणी व कविता ऐकविणे. वाचायला देणे. त्यातील आशय व कल्पना | गाणी व कविता वाचून आवडलेली कल्पना सांगणे. प्रश्नांची उत्तरे | स्व-शब्दांत आपले विचार मांडतात. | कविता समजून घेण्याचा आनंद घेतात. | कविता वाचन स्पर्धेत भाग घेतात. | तोंडी काम (कल्पना कथन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | यांवर आधारित छोटे प्रश्न व आवडलेल्या कल्पना विचारणे. | देणे. मित्रांना प्रश्न विचारून त्यांना आवडलेल्या कल्पना विचारणे. | | | | |
| प्रकट वाचन | विद्यार्थ्यांना आवडतील अशा वाचन साहित्याची निवड करणे. गटात कथा, संवाद, कविता, नाट्कुले इ. साहित्यप्रकार देऊन त्यांचे प्रकट वाचन कसे करायचे त्याची प्रात्यक्षिके घेणे. | शिक्षकांच्या प्रात्यक्षिकांचे निरीक्षण करणे. उच्चारण, विरामचिन्हे, आरोह–अवरोह यांच्या वापराबाबत शंका विचारणे. वर्गासमोर प्रकट वाचन करणे. | साहित्य प्रकारानुसार प्रकट वाचन कसे करायचे ते समजते. | समजून काम केल्याचा आनंद घेतात. | वर्गात प्रकट वाचनाच्या उपक्रमात भाग घेतात. घरी प्रात्यक्षिके दाखवितात. | तोंडी काम (प्रकटवाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सादरीकरण | पाच-पाच विद्यार्थ्यांचा गट करणे. विद्यार्थ्यांना आवडलेल्या साहित्याच्या निवडीस मदत करणे. सादरीकरणाची कल्पना सोदाहरण स्पष्ट करणे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या शैलीत सादरीकरणास प्रोत्साहन देणे. | चर्चा करून कथा, कविता, विनोद इ. साहित्याची निवड करणे. सादरीकरणातील भूमिका समजावून घेणे. गटाने तयारी करून वर्गासमोर साभिनय सादर करणे. | सादरीकरण कसे करायचे ते समजते. | करून पाहिल्याचा आनंद घेतात. | वर्गातील सादरीकरणाच्या उपक्रमात सहभागी होतात. घरी प्रात्यक्षिके दाखवितात. | तोंडी काम (सादरीकरण) |

## इयत्ता–आठवी–पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नांतून पुढील **उद्दिष्टे** साध्य करावीत यासाठी चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. विविध ठिकाणी ऐकलेल्या सूचनांचे सादरीकरण करणे.

२. आवडलेली गोष्ट सांगणे.

३. घटना, चित्रे यांचे स्वतःच्या शब्दांत वर्णन करणे.

४. परिचित विषयावर मुद्देसूद व सुसंगत भाषण करणे.

५. ऐकलेल्या, वाचलेल्या मजकुरातील तपशीलांवर विचारलेल्या प्रश्नांची तोंडी उत्तरे देणे.

६. सुमारे १२०० शब्दांची श्रवणशब्दसंपत्ती, ५०० शब्दांची भाषणशब्दसंपत्ती आणि १४० शब्दांची वाचनशब्दसंपत्ती विकसित करणे.

७. एका मिनिटाला सुमारे ४५ शब्द या गतीने मूकवाचन करण्याचा सराव करणे.

८. स्वतःचे अनुभव, कल्पना, भावना आणि विचार सहा–आठ वाक्यांत लिहिणे.

९. ऐकलेल्या, वाचलेल्या मजकुरातील तपशीलांवर विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे देणे.

१०. गप्पा, संवाद, भाषणे, वाचन यासारख्या उपक्रमांत उत्साहाने सहभागी होऊन श्रवण, भाषण तसेच वाचन शब्दसंपत्तीत वाढ करणे.

११. सामाजिक समस्यांबाबत आपली जबाबदारी समजणे.

१२. सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि त्यांची अर्थासह 'आमचा शब्दसंग्रह' विकसित करण्यासाठी नोंद करणे. तसेच गटात काम करताना सहकार्य वृत्ती जोपासणे.

१३. आवडलेल्या कथा, कविता व विनोद घरी व परिसरात सादर करणे.

# इयत्ता ८ वी – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सूचना | रेल्वे स्थानक, बस स्थानक, शासकीय इमारती, सार्वजनिक बाग, शालेय परिसर या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सूचना (श्राव्य – लिखित) गोळा करावयास सांगणे. सूचना देण्याच्या पद्धती, सूचनांतील आशय याविषयी प्रश्नोत्तरे घेणे. | विविध ठिकाणी ऐकलेल्या वा, तेथून लिहून आणलेल्या सूचना गटात सादर करणे. सूचना कोठे दिली, का दिली, काय दिली, कशी दिली, इ. विषयी गटात प्रश्नोत्तरे घेणे. | विविध सूचना देण्यामागचे हेतू लक्षात येतात. | – | गरजेनुसार आवश्यक सूचना तयार करतात. | उपक्रम<br>प्रकल्प |
| कथा | पाठ्यपुस्तकातील तसेच पुरवणी वाचन | कथेचा विषय सांगणे. कथेतील घटना, मुख्य पात्रे, | घटनांमागील कार्यकारणभाव समजतात. | कथेतील पात्रांच्या भावनांशी समरस होतात. | विविध कथा आवडीने वाचतात, वर्गात वाचून दाखवितात. | तोंडी काम (कथावाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | साहित्यातील कथा वाचण्यास सांगणे. त्यातील तपशिलांवर प्रश्न विचारणे. | त्यांचे वागणे, बोलणे यासंबंधीचे तपशील सांगणे. कथा का आवडली ते सांगणे. | | | कथांवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांगतात. | तोंडी चाचणी |
| कविता | कविता वाचून आशय आणि कल्पना समजून सांगणे. आकलनावर प्रश्न विचारणे. कवीच्या कल्पना स्वतःच्या शब्दांत मांडण्यास प्रोत्साहन देणे. | कविता लक्षपूर्वक वाचणे. कवितेतील आशयावर, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. कवीच्या कल्पना आपल्या शब्दांत मांडणे. | कवी वर्णन करीत असलेली वस्तुस्थिती आणि त्यावरील कल्पना यांचा संबंध लक्षात येतो. | कवीच्या नव–नवीन कल्पनांचा आस्वाद घेतात. | स्वतःला सुचलेल्या कल्पना मित्रांना सांगतात. | तोंडी काम |
| प्रकटवाचन | उताऱ्याचे प्रकटवाचन करताना कोणकोणत्या | शिक्षक/ शिक्षिकांच्या सूचना आणि त्यांनी दिलेली उदाहरणे | – | वाचनाचा आनंद घेतात. | पाठ्य व पाठ्येतर साहित्याचे स्पष्ट व अचूक प्रकटवाचन करतात. | तोंडी चाचणी (प्रकटवाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | भागाकडे विशेष लक्ष द्यावयाचे ते सोदाहरण स्पष्ट करणे. विद्यार्थ्यांचे प्रकटवाचन ऐकणे. चांगले वाचन करणाऱ्यांचे विशेष इतरांच्या लक्षात आणून देणे. | समजून घेणे. स्वतः तसे वाचण्याचा प्रयत्न करणे. चांगले प्रकटवाचन करणाऱ्यांच्या विशेषांचे अनुकरण करणे. | | | | |
| सादरीकरण | परिचित सोप्या कथा, विनोद सांगणे, वाचून दाखविणे. काही संग्रह पुरविणे. त्यातून आवडीनुसार एखादी कथा, कविता, विनोद सादर करण्यास सांगणे. | लक्षपूर्वक, एकाग्रतेने ऐकणे. आपली आवड–नावड सांगणे. संग्रहातून आवडीची कथा, कविता, विनोद सादर करणे. | आवाजातील चढउतार, हावभाव यांनुसार सादरीकरणाची जाणीव होते. | कथा, विनोद, सांगण्याचा, कविता म्हणण्याचा आनंद घेतात. | घरातील माणसांचे कथा, विनोद सांगून मनोरंजन करतात. | तोंडीकाम (कथा, विनोद) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| श्रुतलेखन | परिचित मजकूर स्पष्ट मोठ्याने वाचून दाखविणे. एखाद्या विद्यार्थ्यास परिच्छेदाचे, मजकुराचे वाचन करण्यास सांगणे व इतरांनी लेखन करणे. | ऐकलेल्या मजकुराचे अचूक लेखन करणे. लेखनात विरामचिन्हांचा वापर करणे. लिहिलेला मजकूर परत वाचणे, समजून घेणे. | अक्षरावयवांची दिशा, वळण, लांबी इ. बोधाचे दृढीकरण होते. | नवीन कौशल्य आत्मसात केल्याचा आत्मविश्वास वाढतो. | अपरिचित मजकुराचे श्रुतलेखन करतात. | लेखी चाचणी (श्रुतलेखन) |
| वर्णन (चित्रमालिका) | चित्रांच्या मालिका विद्यार्थ्यांना दाखविणे. चित्रांबद्दल प्रश्न विचारून माहिती काढून घेणे. वर्णन करून घेणे. वर्णनाच्या आधारे गोष्ट तयार करणे. | चित्रमालिकेतील चित्रांचा क्रम लावणे. चित्रांचे वर्णन करणे. गोष्ट तयार करण्यात सहभाग घेणे. | चित्रांचा क्रम जुळविण्याचे आकलन होते. | चित्रमालिकेतील घटना, प्रसंग, पात्र यांच्याशी एकरूप होतात. | चित्रमालिकेचे वर्णन सहजतेने करतात. | तोंडीकाम (वर्णन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| म्हणी व वाक्प्रचार | म्हणीवर आधारित गोष्ट सांगणे. प्रसंग निर्मितीद्वारे वाक्प्रचारांचा परिचय करून देणे. | म्हणींमधील लपलेला आशय लक्षात घेणे. बोलताना योग्य तेथे वाक्प्रचारांचा वापर करणे. | अर्थबोध होतो. | गोष्टीतील आनंद घेतात. | म्हणींवर आधारित गोष्टी सांगतात. | तोंडीकाम (गोष्टी सांगणे) |
| आमचा शब्दसंग्रह | मुलांना शब्द लिहिण्यासाठी प्रवृत्त करणे. | आवडीचे शब्द लिहून त्यापुढे शब्दाची जात लिहिणे व अर्थ शोधून लिहिण्याचा प्रयत्न करणे. | शब्दसंग्रहात वाढ होते. | संग्रह केल्याचा आनंद होतो. | वेगवेगळ्या शब्दांचे अर्थ साहित्यातून शोधतात. आमचा शब्दसंग्रहासाठी यादी तयार करतात. | लेखी काम (शब्दलेखन) |
| **अध्ययन क्षेत्र – भाषेच्या नियम व्यवस्थेचा परिचय** | | | | | | |
| सर्वनाम | दोन उतारे वाचण्यासाठी देणे. उतारा पहिला – यात प्रत्येक वाक्यात कर्त्याचे नाव असेल. | दोन्ही उतारे लक्षपूर्वक वाचणे. | दोन्ही उताऱ्यांतील फरक लक्षात येतो. | नवीन ज्ञानामुळे आनंद होतो. | दिलेल्या उताऱ्यांतील नामे आणि सर्वनामे शोधून लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | उतारा दुसरा – यातील पहिल्या व पाचव्या किंवा सहाव्या वाक्यात त्याचे नाव असेल, इतर वाक्यांत नावांऐवजी सर्वनामांची इष्ट ती रूपे असतील. यापैकी कोणता उतारा नेहमीच्या बोलण्यासारखा वाटतो ते काढून घेणे.<br>पहिला उतारा तसा वाटत नाही, याचे कारण विचारणे.<br>सर्वनामाचे कार्य स्पष्ट करून त्याचे नाव सांगणे. | दुसरा उतारा नेहमीच्या बोलण्यासारखा का वाटतो, ते स्पष्ट करणे आणि पहिला तसा का वाटत नाही याचे कारण सांगणे.<br>सर्वनामाचे कार्य व त्याची विविध रूपे समजून घेणे. | दुसरा उतारा नेहमीच्या बोलण्यासारखा का वाटतो, ते लक्षात येते. | | | |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| विशेषण | उतारा वाचून त्यातील नामे शोधण्यास सांगणे. नामांबद्दल विशेष माहिती देणारे शब्द शोधण्यास सांगणे. त्यांनी दिलेली विशेष माहिती कशासंबंधी आहे, ते शोधून काढण्यास सांगणे. विशेषणाची कार्ये सांगणे. | उतारा काळजीपूर्वक वाचून त्यातील नामे शोधून लिहिणे. नामांबद्दल विशेष माहिती देणारे शब्द शोधून सांगणे. नामांबद्दल कोणती विशेष माहिती सांगितली ते स्पष्ट करणे. | नामाबद्दल सांगितल्या गेलेल्या विशेष माहितीचे आकलन होते. | नवीन ज्ञानाचा आनंद होतो. | दिलेल्या नव्या उताऱ्यातील नामे आणि विशेषणे यांची यादी लिहितात. | प्रकल्प |
| काळ | खेळासाठी द्यावयाच्या सूचना देणे. ''तुम्ही आता जे काही करता आहात त्याबद्दल एक वाक्य लिहा. | सूचनांनुसार कृती करणे. | स्वकृतीचे निरीक्षण करतात. | – | रिकाम्या जागी योग्य क्रियापदांची निवड करून वाक्ये लिहितात. | तोंडी काम, स्वाध्याय |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | आता काल याच वेळी काय करीत होतात त्याबद्दल एक वाक्य लिहा. आता उद्या याच वेळी काय करीत असाल त्याबद्दल एक वाक्य लिहा. आता तीनही वाक्यांतील क्रियापदांचे निरीक्षण करून काय लक्षात येते ते सांगा.'' | निरीक्षण करून क्रियापदांच्या रूपात पडलेला फरक स्पष्ट करणे. | घडलेल्या कृतीचे स्मरण करतात.<br>घडू शकणाऱ्या कृतीची कल्पना करतात. | | दिलेल्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून क्रिया कोणत्या काळात घडली ते लिहितात. | |
| | प्रश्न विचारणे– क्रियापदांच्या बदललेल्या रूपांवरून आपणाला कशाचा बोध होतो? | उत्तर देणे– कृती किंवा क्रिया केव्हा घडली त्याचा बोध होतो. | क्रियापदांच्या रूपांवरून अनुमान बांधतात. | | | |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | अचूक उत्तराला प्रोत्साहन देणे– बरोबर, केव्हा म्हणजेच कोणत्या काळात आज (वर्तमानकाळ), काल (भूतकाळ), उद्या (भविष्यकाळ). मग यावरून क्रियापदांची रूपे आणि क्रिया घडण्याचा काळ याबद्दल काय विधान करता येईल? | | | | | |

## परिशिष्ट – (अ) – उद्दिष्टांचा तुलनात्मक तक्ता –

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ श्रवण – भाषण | १. सूचना ऐकून व ओळखून कृती करणे. | ⟶ | – | – | | १ सलग सूचना ऐकून त्यानुसार कृती करणे. | १ सार्वजनिक ठिकाणी दिलेल्या श्राव्य सूचना समजणे. | १ विविध ठिकाणी ऐकलेल्या सूचनांचे सादरीकरण करणे. |
| | २. योग्य उच्चारांसह गाणी म्हणणे. | १. गाणी समूहात व एकट्याने म्हणणे. | १. सुचविलेल्या विषयांवरील गाणी म्हणणे. दररोजचा वार व दिनांक सांगणे. | – | – | २ गाणी, कविता एकट्याने आणि समूहात तालासुरात म्हणणे. | २ गाणी व कवितांमधील आशय आणि कवीने केलेल्या कल्पना सांगणे. | |
| | ३. चित्रांच्या साहाय्याने गोष्ट सांगणे. | २. चित्र मालिकेच्या साहाय्याने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करणे. | – | – | – | ३ ऐकून आवडलेल्या गोष्टी सांगणे. | ३ पाठ्य व पुरवणी वाचन साहित्यांतील, कथांमधील आणि नाटकांतील घटनांचा क्रम व त्यामागील कारणे सांगणे. | २ आवडलेली गोष्ट सांगणे. • घटना, चित्रे यांचे स्वतःच्या शब्दांत वर्णन करणे. |
| | ४. मराठी शिष्टाचार पाळणे. | ३. विविध लोकांशी योग्य प्रकारे संवाद साधणे. | – | – | – | – | | |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५. स्वतः– बद्दल व कुटुंबियांबद्दल माहिती सांगणे. | ४ वस्तू, पशू, पक्षी, चित्रे इ. बद्दल माहिती सांगणे.<br>• शाळेबद्दल, गावातील/ शहरातील ठिकाणांबद्दल माहिती सांगणे. | – | – | – | – | – | – |
| | | ५ आवडते खेळ– खेळणी, वाहने अन्य वस्तू यांच्याबद्दल मित्रांशी गप्पा मारणे. | – | – | – | – | – | – |
| | ६ ध्वनी– भेद लक्षात घेऊन उच्चारण करणे. | – | – | १. परिचित शब्दांच्या साहाय्याने तोंडी वाक्ये तयार करणे. | – | – | – | – |
| | | | | | १ शाळेतील अनुभव घरातील आणि परिसरातील व्यक्तींपुढे प्रात्यक्षिकांसह सादर करणे. | – | – | ३. परिचित विषयावर मुद्देसूद व सुसंगत भाषण करणे.<br>४. ऐकलेल्या, वाचलेल्या मजकुरातील तपशिलांवर विचारलेल्या प्रश्नांची तोंडी उत्तरे देणे. |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ वाचन | १. सुमारे २५ दृक् शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे. | १. सुमारे ५० दृक् शब्दांची वाचन शब्द संपत्ती विकसित करणे.<br><br>२. सूचना वाचून सूचनेनुसार कृती करणे. | १. सुमारे ७० शब्दांची दृक् शब्दसंपत्ती विकसित होणे.<br><br>२. चित्र– शब्दपट्ट्या ओळखणे.<br>• चित्रांशिवाय शब्द पट्ट्या ओळखणे.<br><br>३. परिचित शब्दांच्या आद्य वा अंत्याक्षरांवरून स्वरचिन्हांचा परिचय करून घेणे.<br><br>४. उच्चार साम्यावरून मुळाक्षरांची पारंपरिक रचना विकसित करणे. | १. सुमारे ८० शब्दांची दृक् शब्दसंपत्ती विकसित करणे.<br><br>२. परिचित अक्षरे व स्वरचिन्हे यांच्या साहाय्याने बनविलेले शब्द वाचणे.<br><br>३. परिचित शब्दांच्या साहाय्याने तयार केलेली वाक्यकार्डे वाचणे.<br><br>४ दृक् शब्दांच्या साहाय्याने तयार केलेले अनुभव तक्ते वाचणे. | १. सुमारे ९० शब्दांची दृक् वाचन शब्द संपत्ती विकसितकरणे.<br><br>२. स्पष्ट शब्दोच्चारांसह समजून प्रकटवाचन करणे.<br><br>३. एका मिनिटाला ३० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे. | १. सुमारे १०० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.<br><br>– | १. सुमारे १२० शब्दांची वाचन शब्द संपत्ती विकसितकरणे.<br><br>२. अचूक स्पष्ट शब्दोच्चार तसेच विरामचिन्हे लक्षात घेऊन प्रकटवाचन करणे.<br><br>– | १. सुमारे १४० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे. |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ लेखन | | | | | १. रेषेची लांबी, दिशा आणि वळणे लक्षात घेऊन शब्द लेखन करण्याचा सराव करणे. | १. विराम – चिन्हांसह अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करणे.<br>२. स्वतःचे अनुभव आणि कल्पना दोन–चार वाक्यांत प्रकट करणे. | १. परिचित मजकुराचे अनुलेखन व श्रुतलेखन करणे.<br>२. स्वतःचे अनुभव कल्पना, भावना व विचार चार–सहा वाक्यात प्रकट करणे. | १. स्वतःचे अनुभव कल्पना, भावना आणि विचार सहा–आठ वाक्यांत प्रकट करणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या मजकुरातील तपशिलांवर विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे देणे. |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. नियम आकलन | | | | १. शब्दांची नादमयता ओळखणे. | | १. वाक्यातील नामांचे लिंग व वचन ओळखणे.<br>२. दिलेल्या शब्दांचे विरुद्ध अर्थांचे शब्द सांगणे. | १. नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या शब्दांच्या जातींची वैशिष्ट्ये ओळखून त्यांचा उपयोग करणे. | |
| ५. शब्दसंग्रहण | १. सुमारे ५०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे १५० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसित करणे. | १. सुमारे ६०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे २०० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसित करणे. | १. सुमारे ७०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे २५० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसित करणे. | १. सुमारे ८०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे ३०० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसितकरणे. | १. सुमारे ९०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे ३५० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसितकरणे. | १. सुमारे १००० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती,<br>४०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती विकसित करणे. | १. सुमारे ११०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे ४५० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसितकरणे. | १. सुमारे १२०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>२. सुमारे ५०० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसितकरणे. |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३. परिचित अक्षरे व स्वरचिन्हे यांच्या साहाय्याने नवे शब्द बनविणे. | ३. श्रवण, भाषण तसेच वाचन शब्द संपत्तीचा संग्रह करणे. | | ३. सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि त्यांची अर्थासह, 'आमचा शब्दसंग्रह' विकसित करण्यासाठी नोंद करणे. | ३. गप्पा, संभाषणे, वाचन यांसारख्या उपक्रमांत उत्साहानेसहभागी होऊन श्रवण, भाषण तसेच वाचन शब्दसंपत्तीत वाढ करणे.<br>४. सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि त्यांची अर्थासह, 'आमचा शब्दसंग्रह विकसित करण्या-साठी नोंद करणे. |
| ६. संवेदन-शीलता | | | | | १. वर्गमित्रांचे रीतिरिवाज, अनुभव, भावभावना समजून घेणे.<br>२.कथा, कवितांमधील व्यक्तिरेखांच्या भावभावना समजणे. | १. साहित्यातील वर्णन केलेल्या समस्या समजणे.<br>२. सामाजिक समस्यांबद्दल अन्य व्यक्तींशी चर्चा करणे. | १. अन्य व्यक्तींच्या जीवनातील अनुभव समजून घेणे.<br>२. अन्य भाषांबद्दल आदर बाळगणे. | १. गटात काम करताना सहकार्य वृत्ती जोपासणे.<br>२. सामाजिक समस्यांबाबत आपली जबाबदारी समजणे. |

| क्षमता क्षेत्र | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | इयत्ता पाचवी | इयत्ता सहावी | इयत्ता सातवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. साहित्य आस्वाद | | | | | १. पाठ्यपुस्तकाच्या आणि अपरिचित वाचनसाहित्यांच्या वाचनाचा आनंद घेणे. | १. आनंद घेत कवितांचे वाचन करणे.<br>१. प्रकट वाचनातील समान अक्षरांच्या अथवा शब्दांच्या पुनरावृत्तीमुळे येणारी मजा अनुभवणे. | | |
| ८. स्व– अभिव्यक्ती | | | | | | | १. आवडलेली कथा, कविता, विनोद साभिनय सादर करणे. | १. आवडलेल्या कथा, कविता, विनोद वर्गात/ घरी/ परिसरात सादर करणे. |

# परिशिष्ट ब   दृष्टिक्षेपात संबोधांची मांडणी

(**सूचना :** तेच संबोध पुढील टप्प्यात असतील तर ⟶ याखूणेने दाखविले आहेत.)

| अध्ययन क्षेत्र | | अध्ययन टप्पे | | | |
|---|---|---|---|---|---|
| भाषेचे अध्ययन | | इयत्ता पहिली, दुसरी | इयत्ता तिसरी, चौथी | इयत्ता पाचवी, सहावी | इयत्ता सातवी, आठवी |
| उपक्षेत्र | संबोध | संबोधाचे विस्तारित रूप अथवा प्रकार | | | |
| १.१. श्रवण – भाषण | रीतिरिवाज | अभिवादन | ⟶ | ⟶ | विनंती सूचना |
| | भाषिक खेळ | सूचनांनुसार कृती | नादमय शब्द नावांच्या भेंड्या | अक्षराधारित | शब्दकोडी |
| | ध्वनी भेद | वस्तुंचा नाद व वस्तू साहचर्य, पशु, पक्षी व त्यांचे आवाज | शब्दांची नादमयता | परिसरातील ध्वनींची ओळख | नादमय शब्दांवर आधारित सादरीकरण |
| | गाणी/गीत | बडबडगाणी, अभिनयगीत नाद, लय सूरमयी गाणी | समूह, कृतियुक्त | देशभक्तीपर समूहगीते | ⟶ |
| | गोष्टी/कथा | चित्रकथा, बाहुलीनाट्य, चित्रमालिका | हावभावासहित, चित्रमालिकेवर आधारित | कथाकथन (विविध विषयांवरील कथा) | पाठ्यपुस्तक व पुरवणीवाचनातील आशयावर आधारित, आवडीचे कारण |
| | माहिती | स्वतःची माहिती, कुटुंबातील व्यक्ती | शाळा व शाळेतील व्यक्तींची माहिती | परिसराची माहिती | गाव/शहरातील प्रसिद्ध ठिकाणांची माहिती |
| | गप्पा | मित्रांशी | मित्र व घरातील व्यक्तींशी | परिसरातील व्यक्ती | अनुभव देवाण–घेवाण |
| | संवाद | व्यावसायिकांशी ⟶ | ⟶ | ⟶ | देवाण घेवाण, प्रश्नोत्तरे शब्दसंपादन |
| | कथन | | व्यावहारिक अनुभव, गोष्टीं ⟶ | ⟶ | विशेष अनुभव |

| भाषेचे अध्ययन | | इयत्ता पहिली, दुसरी | इयत्ता तिसरी, चौथी | इयत्ता पाचवी, सहावी | इयत्ता सातवी, आठवी |
|---|---|---|---|---|---|
| **उपक्षेत्र** | **संबोध** | **संबोधाचे विस्तारित रूप अथवा प्रकार** | | | |
| १.२ वाचन लेखन | विनोद | | प्रासंगिक | | श्राव्य व लिखित सूचना (सूचनांनुसार कृती) |
| | सूचना | भाषिक खेळ | सलग सूचनांनुसार कृती | अनुभवावर आधारित | सार्वजनिक परिसरातील सूचना |
| | भाषण | | | | |
| | कविता | | | | वस्तुस्थिती व कल्पनांवर आधारित |
| | वर्णन | | | | चित्रमालिकेतील चित्र वर्णन, गोष्ट तयार करणे. अनौपचारिक |
| | उपक्रम | अभिवादन पद्धती | | | |
| | आकारभेद | पक्षी, पशू, वाहने यांची बिंदू चित्रे | आकृत्यांतील फरक मुळाक्षरे व स्वरचिन्हांवर आधारित | शब्दलेखन (दिलेल्या अक्षरांच्या मदतीने) वाक्यलेखन | |
| | शब्दओळख | मुलांची श्रवण–भाषण शब्दसंपत्ती, चित्रयुक्त शब्द, दृक्‌शब्द पट्ट्या वाक्यसाचे | नाणी, नोटा, संख्या, अंक, नाती यांची नावे परिचित शब्द | (स्वतःतयार केलेल्या शब्दांच्या आधारे) शब्दसंग्रह | शब्दसंग्रह शब्द जात व अर्थासहित आवडीचे शब्द |
| | वर्णन | | चित्र व शब्दपट्ट्या चित्र, प्रसंगचित्र | | |
| | मजकूर | परिचित शब्दांचा मजकूर | परिचित शब्दांचा तक्ता | | |

| भाषेचे अध्ययन | | इयत्ता पहिली, दुसरी | इयत्ता तिसरी, चौथी | इयत्ता पाचवी, सहावी | इयत्ता सातवी, आठवी |
|---|---|---|---|---|---|
| उपक्षेत्र | संबोध | संबोधाचे विस्तारित रूप अथवा प्रकार | | | |
| | तक्ता | | अनुभव वर्णन → | | |
| | अक्षर | | अक्षर आकार | अक्षर जुळणीतून नवीन शब्द | |
| | कविता | | प्रकटवाचन, अनुवाचन | सुलेखन | आशयावर आधारित कविता 'स्व' शब्द कल्पना व आशय |
| | विनोद | | प्रासंगिक विनोद → | | |
| | अनुलेखन श्रुतलेखन | | | शब्द, वाक्ये | विराम चिन्हांनी युक्त अचूक लेखन |
| | मूकवाचन | | | पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकेतर साहित्य नादमय शब्दवाचन कथा, कविता, विनोद, कोडी इ. वाचनकार्ड | अंदाज कार्यकारणभाव शोधण्यासाठी वाचन |
| | प्रकटवाचन | | | पाठ्यपुस्तक वाचन साहित्य प्रकार ओळख अक्षर, शब्द पुनरावृत्त युक्त | उच्चारण आरोह व अवरोह विरामचिन्हांसह वर्गासमोर प्रकटवाचन |
| | कथा | | | स्पष्ट शब्दोच्चार व योग्य आवाज आकलन व शंका निरसन | कथेतील विषय, घटना, मुख्य पात्रे |

| भाषेचे अध्ययन | | इयत्ता पहिली, दुसरी | इयत्ता तिसरी, चौथी | इयत्ता पाचवी, सहावी | इयत्ता सातवी, आठवी |
|---|---|---|---|---|---|
| **उपक्षेत्र** | **संबोध** | **संबोधाचे विस्तारित रूप अथवा प्रकार** | | | |
| २. भाषेच्या नियम व्यवस्थेचा परिचय | शब्दविचार<br>मुळाक्षरे<br>स्वरचिन्हे | | उच्चारणानुसार शोध व वर्गीकरण | | |
| | अक्षरावयव | | समान अक्षरावयांचे वर्गीकरण | | |
| | वाक्य | | दर्शक सर्वनाम व क्रियापदांवर आधारित | | |
| | जोडाक्षरयुक्त शब्द | | योग्य उच्चारासह वाचन | | |
| | विरामचिन्ह<br>पूर्णविराम<br>स्वल्पविराम<br>प्रश्नचिन्ह<br>शब्दांच्या नाम जाती<br>सर्वनाम<br>विशेषण<br>क्रियापद<br>काळ | | | नादमय, विरुध्दार्थी<br>संदर्भअर्थ (परिचित शब्दांचे)<br>लिंग<br>विरामचिन्हांचा परिचय<br>सामान्य नाम<br>विशेष नाम<br>उपयोग, अर्थ, व्याख्या | कार्ये व विविध रूपे<br>कार्ये व विशेष रूपे<br>कार्ये वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळ बोध |
| | वचन | | | व्याख्या<br>एकवचन अनेकवचन | |
| | म्हणी व वाक्प्रचार | | | | अर्थशोधन व उपयोग |

| भाषेचे अध्ययन | | इयत्ता पहिली, दुसरी | इयत्ता तिसरी, चौथी | इयत्ता पाचवी, सहावी | इयत्ता सातवी, आठवी |
|---|---|---|---|---|---|
| **उपक्षेत्र** | **संबोध** | **संबोधाचे विस्तारित रूप अथवा प्रकार** | | | |
| ३. साहित्याचा आस्वाद | कविता | ताल सूर व लय | कल्पनारम्यता ताल, सूर, लय. | वस्तुस्थिती व कवी कल्पना → | |
| ४. लेखी अभिव्यक्ती | कथा, कविता, विनोद इ. सादरीकरण | | | स्वतःच्या भावना, कल्पना, विचार इ. मजकूर लेखन | आवडत्या विषयांवर<br>आशय व कल्पनांची मौखिक अभिव्यक्ती<br>पात्रस्वभावानुसार स्वशैलीत आणि साभिनय सादरीकरण<br>स्व निवडीच्या साहित्य प्रकारचे सादरीकरण |